-: प्रेसनोट :-

वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई यांनी सोनसाखळी चोरीच्या गुन्हयातील सराईत आरोपीतांना राजस्थान भिलवाडा येथून अटक करून सोनसाखळी जबरीचोरी या गुन्हयातील एकूण ०६ गुन्हे उघडकीस आणलेबाबत.

वांद्रे पोलीस ठाणे हददीत दिनांक १५/११/२०२६ रोजी १९:४० वाजताचे सुमारास युनियन बॅंकेजवळ, ओलार बिल्डींग, सेंट सेबिस्टीन रोड, वांद्रे पश्चिम, मुंबई या ठिकाणी फिर्यादी श्रीमती पल्लवी अरविंद वाघेला, वय ४८ वर्षे या त्यांचे पती सोबत पायी जात असताना दोन अनोळखी बाईकस्वार इसमांनी आपसात संगनमत करून त्यांचे गळयातील ०६ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जबरीने खेचून पळून गेले म्हणून फिर्यादींनी त्या दोन अनोळखी इसमांविरोधात कायदेशीर तक्रार दिल्याने त्यांचा सविस्तर जबाब नोंद करून दिनांक १५/११/२०२६ रोजी वांद्रे पोलीस ठाणे गु.र.क्र. २४८३/२६ कलम ३०४(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन गुन्हयाचा तांत्रिक तपास केला असता गुन्हयातील दोन्ही आरोपी हे भिलवाडा, राज्य-राजस्थान येथील असल्याचे माहिती प्राप्त झाली. नमुद दोन्ही आरोपी यांनी मिळुन चैन स्नॅचिंग करण्यासाठी भिलवाडा, राजस्थान येथुन रेल्वेने मुंबईत येवुन शिवाजी पार्क पोलीस ठाणे हद्दीतुन मोटारसायकल चोरी करून मुंबई शहरात विविध ठिकाणी चैन स्नॅचिंग केल्या व चैन स्नॅचिंग करून ते पुन्हा रेल्वेने भिलवाडा, राजस्थान येथे पळुन गेले.

नमुद आरोपींचा शोध घेणेकामी वांद्रे पो.ठाणे चे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व पथक हे दि. १७/११/२६ रोजी भिलवाडा, राज्य-राजस्थान या ठिकाणी रवाना करण्यात आले. नमुद आरोपीतांचा भिलवाडा राजस्थान येथे शोध घेतला त्यातील एक आरोपी मिळून आल्याने त्यास पुर पोलीस ठाणे, भिलवाडा, राजस्थान या ठिकाणी अटक करून मा. मुख्य सत्र न्यायाधीश, भिलवाडा, राजस्थान यांच्यासमक्ष ट्रान्झिस रिमांडकामी हजर केले असता मा. न्यायालयाने ट्रान्झिस रिमांड मंजुर केले.

नमुद अटक आरोपीकडे केलेल्या अधिक तपासात त्याने त्याच्या साथीदारासोबत संगनमत करून बाईकवरून मुंबई मध्ये वांद्रे, विलेपार्ले, अंधेरी या ठिकाणी चैन स्नॅचिंग केले असल्याचे सांगितल्याने त्याच्या साथीदारास सुभाषनगर भिलवाडा, राजस्थान येथुन ताब्यात घेवुन तो विधीसंघर्ष ग्रस्त बालक असल्याने भिलवाडा बाल न्यायालय मंडल पालडी येथे हजर केले असता मा. बाल न्यायमंडळाने त्यास ट्रान्झिस रिमांड मंजुर केले. त्यानंतर नमुद अटक आरोपी व विधीसंघर्ष बालकास वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई येथे आणुन अटक आरोपीस मा. न्यायालयासमक्ष पोलीस कोठडी मिळणेबाबत रिमांडकामी हजर करण्यात आले व विधीसंघर्ष बालकास मा. बाल न्यायालय, डोगरी, मुंबई यांचेसमक्ष हजर करून सुरक्षिततेकामी बाल सुधारगृह, डोंगरी, मुंबई येथे जमा करण्यात आले.

नमुद अटक आरोपी व विधीसंघर्ष बालक यांचेकडुन अं.किं.रू. ७,९७,५२०/- इतक्या रकमेचे एकुण ६५ ग्रॅम ७९० मिली वजनाच्या एकुण ०७ सोन्याच्या चैन हस्तगत करण्यात आल्या.

नमूद हस्तगत केलेल्या मालमत्तेवरून वांद्रे पोलीस ठाणेचा ०१ गुन्हा, विलेपार्ले पोलीस ठाणेचे ०३ गुन्हे, अंधेरी पोलीस ठाणेचा ०१ गुन्हा व शिवाजी पार्क पोलीस ठाणेचा ०१ गुन्हा असे एकुण ०६ गुन्हे उघडकीस करण्यात आले आहेत.

नमुद अटक आरोपीताविरूध्द मुंबई व राजस्थान येथे जबरी चोरी, चोरी, खुनाचा प्रयत्न, दुखापत व इतर असे एकुण ०९ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई मा. श्री. अभिनव देशमुख, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मा. श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ-२, मुंबई, मा. श्री. दत्ता नलावडे, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ-३ (अति. कार्यभार पश्चिम परिमंडळ-२), मुंबई. मा. श्री. अधिकराव पोळ, सहा. पोलीस आयुक्त, वांद्रे विभाग, मुंबई यांनी केलेल्या मार्गदर्शनाखाली वांद्रे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. रविंद्र साळुंखे, पोलीस निरीक्षक अजय लिंगनूरकर तसेच वांद्रे पोलीस ठाणे येथील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी सपोनि यशवंत पालवे, सपोनि राजेंद्र नागरे व पो.ह.क्र. ०३.११६६/माने, पो.ह.क्र.०८.१६८६/साबळे, पो.ह.क्र.०८.१७०१/भोगले, पो.ह.क्र.०९.०१३३/गुरव, पो.ह.क्र. ०९,०७६९/रकटे, पो.शि.क्र. ०९.२०३७/पवार, पो.शि.क्र. ११.३३७६/सावंत, पो.शि.क्र. १४.१९१४/पाटील यांनी पार पाडली असुन गुन्हयाचा पुढिल तपास मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. यशवंत पालवे हे करीत आहेत.
